## FACILITIES AVAILABLE



Alcon Centurion Vision System, USA


Alcon constellation vision system, USA



Zeiss Lumera - I operating microscope, Germany


Zeiss IOL Master, Germany


Fundus Camera By Topcon, Japan


Optical Coherence Tomography System (O.C.T.) by Optovue USA


Tomey Specular Microscope


Corneal Topgraphy By Oculus


Green Laser Photocoagulator Gyc 1000, Nidek, Japan


Zeiss Humpfrey Field Analyser HFA-3, Germany


Eyelight Dry Eye Treatment, Italy


Alcon Verion


## डॉ. अनिल कुलकर्णी नेत्र रुग्णालय

२/२०,२१, हिरेमठ प्लॉट, वंटमुरे कॉर्नर जवळ, सांगली रोड, मिरज-४१६४१०
फोन:०२३३ २२११५६६/२२११६६६.मो.९१४२२११६६६
email : ameya.lasers @gmail.com / anilkeye@gmail.com


**मिरज । पुणे । सातारा । चिपळूण**

AKEH

# कुलकर्णी नेत्र रुग्णालय

Multispecialty Eye Hospital | Phaco Research and Training Centre
ISO 9001:2015 Certified

NABH ACCREDITED

40 YEARS OF QUALITY EYE CARE




WE CARE

# ग्लॉकोमा

## आंधळेपणा येण्याचे एक कारण



www.dranilkulkarni.com


फोन:०२३३ २२११५६६/२२११६६६.मो.९१४२२११६६६

# काचबिंदू (ग्लॉकोमा)

## वेळेत उपचार न झाल्याने ग्लॉकोमामुळे दृष्टी कायमची जाऊ शकते

## काचबिंदू (ग्लॉकोमामुळे) डोळ्यांच्या आतील मज्जातंतूच्या समूहास इजा पोहोचते.

डोळ्यामधील असलेल्या मज्जातंतूच्या समूहास इजा झाल्यामुळे काचबिंदू (ग्लॉकोमा) हा रोग होतो. प्राथमिक अवस्थेत काही लक्षणे जाणवू शकतात. परंतु कधी कधी दृष्टी एकदम अधू होते. बहुतेक वेळा रूग्णाला काचबिंदू (ग्लॉकोमा) झाला आहे याची जाणीव होतच नाही. वेळेत उपचार न झाल्याने काचबिंदू (ग्लॉकोमा) मुळे दृष्टी कायमची जाऊ शकते.

काचबिंदू (ग्लॉकोमा) मुळे इन्ट्राऑक्युलर प्रेशर (IOP) अथवा डोळ्यांच्या आतील दाब वाढतो. डोळ्यामध्ये नैसर्गिकपणे एक स्त्राव तयार होत असतो व वाहून जात असतो. इन्ट्राऑक्युलर प्रेशर जास्त झाल्यास स्त्राव वाहून नेणाऱ्या नसांचे नैसर्गिक काम बंद होते. वाढलेल्या इन्ट्राऑक्युलर प्रेशर मुळे डोळ्याच्या आतील शिरांना इजा होते. या सगळ्याच्या एकत्रित परिणामाने दृष्टी अधू होण्यास सुरवात होते. सुरवातीस अंधुक दिसते अथवा कडेचे कमी दिसते. वाढलेला दाब शिरांच्या नाजुक तंतूना इजा करतो.

### काचबिंदू (ग्लाकोमा) चे निदान करण्यास उशीर झाल्यास त्यावर उपचार करणे गुंतागंतीचे ठरते.

### काचबिंदू (ग्लाकोमा) होण्याची कारणे :

- रूग्णाच्या जवळच्या नातेवाइकांना काचबिंदू असण्याचा इतिहास.
- पिढीजात लक्षात न आलेला काचबिंदू (ग्लॉकोमा).
- वयाच्या ४० नंतर नैसर्गिक पणे.
- डायबेटीस (Diabetes).
- आजारांवर दीर्घकाळ घेतली जाणारी औषधे (Steroids type).
- अपघातात डोळ्यांना मार बसणे.
- डोळ्यांचे दीर्घकाळ आजार.

### काचबिंदू (ग्लॉकोमा) चे निदान कसे होते?

- नेत्रतज्ञ सखोल तपासणी व लक्षणांवरुन ग्लॉकोमा चे निदान करतात.
- अंतर्गत तपासणीत डोळ्याचा दाब मोजला जातो.
- बाह्य तपासणीत दिसण्याचे प्रमाण व व्यापकता कळते.
- पेरिमेट्री आणि ओ. सी. टी. या तपासण्यांमुळे काचबिंदूचे निदान, नुकसान होण्यापूर्वी करता येते.

### काचबिंदू (ग्लॉकोमा) साठी उपचार पध्दत :


- काचबिंदू (ग्लॉकोमा) पूर्ण बरा होत नाही. दृष्टी पूर्ववत होत नाही.
- डोळ्याचा दाब औषधोपचारांनी कमी होतो.
- गरज असल्यास नेत्रतज्ञ शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला देतात.
- वेळेत औषधे घेणे व तपासण्या करणे योग्य ठरते.
- वेळेत निदान झाल्यास योग्य उपचारांनी काचबिंदू (ग्लॉकोमा) नियंत्रित ठेवता येतो.



Normal Vision


Early Glaucoma


Advanced Glaucoma


Extreme Glaucoma




**Glaucoma surgery**- creates an alternative pathway for intraocular fluid drainage